**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**विद्यार्थी विकास विभाग**
दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३/विवि/**२१**/२०२३
दिनांक : ३०.०१.२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : लोकप्रिय चित्ररथ श्रेणीसाठी सर्वोत्कृष्ठ पसंती नोंदविण्याबाबत आवाहन.**
संदर्भ : शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.ससं/उशि/अनि-१/२०२३/४८८ दिनांक २३.०१.२०२३

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्राप्त पत्रानुसार लोकप्रिय चित्ररथ श्रेणीसाठी सर्वोत्कृष्ठ पसंती नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. कृपया सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्याअनुषंगाने आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी.

लोकप्रिय चित्ररथ श्रेणीसाठी सर्वोत्कृष्ठ पसंती नोंदविण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांना वोटिंग करण्यासाठी कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र** : शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.ससं/उशि/अनि-१/२०२३/४८८ दिनांक २३.०१.२०२३

**प्रतिलिपी :**
१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
४. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्र.उशिसं /२०२३/संकीर्ण/ मवि-१ १७४२ दिनांक - २७/१/२०२३

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित** 27 JAN 2023

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय - लोकप्रिय चित्ररथ श्रेणीसाठी सर्वोत्कृष्ठ पसंती नोंदविण्याबाबत आवाहन.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्ती हा विषय चित्ररथाव्दारे महाराष्ट्राने दिल्ली येथील कर्तव्यपथावर प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिमाखात सादर केला.

यामध्ये महाराष्ट्रातील अध्यात्मिक शक्ती असलेल्या साडेतीन पिठाचा देखावा, महाराष्ट्राची अमूर्त लोककला आणि वैशिष्टयपूर्ण मंदिर शैली दाखवण्यात आली होती.

चित्ररथाला दोन प्रकारचे पुरस्कार असून पहिल्या प्रकारचा पुरस्कार तज्ञ समितीच्या अहवालावरुन मिळेल तर दुस-या प्रकारचा पुरस्कार लोकप्रिय चित्ररथ या सदराखाली लोकांनी ऑनलाईन वोटिंग केल्यानुसार मिळेल.

त्यानुसार लोकप्रिय चित्ररथ श्रेणीसाठी सर्वोत्कृष्ठ पसंती नोंदविण्यासाठी आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांना वोटिंगसाठी आवाहन करण्यात यावे.

साडेतीन शक्तीपीठे व नारीशक्ती या महाराष्ट्राच्या चित्ररथाला क्रमांक १ च्या पसंतीसाठी आपल्या मोबाईल क्रमांकावरुन खालीलप्रमाणे मेसेज मंगळवार दि.३१ जानेवारी २०२३ च्या रात्री ११.४५ वाजेपर्यंत पाठवावा.

**MYGOVPOLL 337011,12** हा एसएमएस **7738299899** या मोबाईल क्रमांकावर पाठवावा. किंवा खालील लिंकवर जाऊन महाराष्ट्र या नांवासमोर ऑनलाईन मत नोंदविता येईल.
**https://www.mygov.in/group-poll/vote-your-favourite-tableau-republic-day-2023/**

केलेली कार्यवाही संचालनालयास अवगत करण्यात यावी.

**(डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.